04-04-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 04/03/2025 10:16 PM Page 1



केबल कापण्याचा निर्णयाला स्थगिती
» पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




बेंगळुरू एफसीचे पाऊल पडते पुढे
» पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, ४ एप्रिल २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 211 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 4 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### वीज कोसळण्याचा 'अलर्ट' मिळणार

**नवी दिल्ली, दि. ३ :** मुसळधार पावसात वीज कोसळून अनेकांना आपला जीव गमवावा लागतो. तसेच दरवर्षी वीज कोसळल्यामुळे मोठे नुकसान होते. या नैसर्गिक संकटापासून सुटका करण्यासाठी इस्रोने आणखी एक कौतुकास्पद कामगिरी केली आहे. देशातील कोणत्या भागात कधी वीज कोसळणार आहे, याची माहिती आता अडीच तास आधीच कळणार आहे. वीज कोसळण्याचा अलर्ट देणारी नवी टेक्नोलॉजी इस्रोने विकसित केली आहे. इस्रोने विकसित केलेल्या नव्या सिस्टमअंतर्गत सॅटेलाईट आणि ग्राऊंड आधारित सेन्सरच्या मदतीने वातावरणातील आयनोस्फेरिक बदलाला ट्रक केले जाणार आहे. यानंतर काम्प्युटर आधारित अल्गोरिदम हा अंदाज लावेल की, कोणत्या भागात वीज कोसळण्याची शक्यता अधिक आहे. हा अलर्ट हवामान विभागामार्फत सर्वसामान्य लोकांपर्यंत दिला जाईल. देशातील उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि महाराष्ट्र यांसारख्या राज्यात दरवर्षी वीज कोसळल्याने मोठे नुकसान होते. परंतु इस्रोच्या या नव्या टेक्नोलॉजीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना आधीच अलर्ट मिळू शकणार आहे.

---

### विमान कोसळून वैमानिक ठार

**सुरत, दि. ३ :** गुजरातमध्ये बुधवारी रात्री भारतीय हवाई दलाचे विमान कोसळले. या दुर्घटनेत एक वैमानिक ठार झाला असून एकावर उपचार सुरु आहेत, अशी माहिती भारतीय हवाई दलाने सोशल मीडिया फ्लॅटफॉर्म दवर पोस्टच्या माध्यमातून दिली आहे. या अपघाताच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. हवाई दलाने म्हटले आहे की, बुधवारी रात्री प्रशिक्षण मोहिमेदरम्यान गुजरातमधील जामनगर हवाई दलाच्या तळाजवळील एका गावात भारतीय हवाई दलाचे जग्वार लढाऊ विमान कोसळले. वैमानिकांना विमानात तांत्रिक बिघाड लक्षात आला. त्यांनी विमानातून बाहेर पडण्याची प्रक्रिया सुरू केली. त्यांनी एअरफील्ड किंवा स्थानिक लोकांचे कोणतेही नुकसान होणार नाही, याचीही खात्री केली. या दुर्घटनेत एका वैमानिकाला गंभीर दुखापत झाली. त्याचा मृत्यू झाला.

---

### आता शुभांशू शुक्ला अंतराळात जाणार

**नवी दिल्ली, दि. ३ :** १९८४ मध्ये राकेश शर्मा हे अंतराळात जाणारे पहिले भारतीय ठरले होते. त्यांच्यानंतर आता शुभांशू शुक्ला अंतराळात जाण्यासाठी सज्ज झाले आहेत.काही दिवसांपुर्वीच अंतराळ स्थानकात तब्बल २८५ दिवसांच्या वास्तव्यानंतर भारतीय मूळ असलेली अमेरिकन अंतराळवीर सुनिता विल्यम्स आणि अमेरिकेचे बुच विल्मोर हे नासाचे अंतराळवीर पृथ्वीवर परतले आहेत. त्यानंतर आता शुभांशु शुक्लाच्या रूपाने आणखी एक भारतीय अंतराळात झेपावणार आहेत. ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ल आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले भारतीय अंतराळवीर ठरणार आहेत. ते एक इंडियन एअरफोर्समधील अनुभवी पायलट आहेत.

#### हवामान

कमाल : ३५ किमान : २६
आर्द्रता :६५

#### बाजार भाव

सोने : ₹ ९३,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,०५,१०० (१किलो)

#### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७६,२९५ .७७ ↑ (२३१.१६ )
निफ्टी : २३,२५०.९० ↑ (८३.९५)

# महिला काँग्रेसचा मोर्चा; समान हकांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ३ : 'महिलांसाठी न्याय' या घोषणांसह गोवा प्रदेश महिला काँग्रेसच्या सदस्यांनी गुरुवारी 'नारी न्याय आंदोलन' अंतर्गत महिला न्याय मोर्चा काढला. महिलांचे हक्क, लिंग समानता आणि महिला आरक्षण कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनजागृती करण्याचा या मोर्चाचा उद्देश होता.**




काँग्रेस हाऊस ते आझाद मैदान या मार्गावर काढलेल्या या मोर्चात महिला काँग्रेसच्या नेत्यांसह कार्यकर्ते आणि समर्थकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. लाल पोशाख परिधान करून त्यांनी महिला सशक्तीकरणाचे आणि दृढनिश्चयाचे प्रतीक साकारले.

यावेळी महिला काँग्रेसच्या नेत्यांनी महिला आरक्षण विधेयकावर त्वरित अंमलात आणण्याची मागणी केली. त्यामुळे प्रशासनाच्या सर्व स्तरांवर महिलांना अधिक राजकीय प्रतिनिधित्व मिळेल आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचा सक्रीय सहभाग राहील.

गोवा प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. प्रतीक्षा खलप म्हणाल्या की, हे आंदोलन संपूर्ण देशभर सुरू आहे. आम्ही महिलांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवत आहोत. महिलांची लोकसंख्या ५०% पेक्षा अधिक असूनही, केवळ त्यांचा मतपेढी म्हणून वापर केला जात आहे. सरकारने महिलांसाठी ठोस पावले उचललेली नाहीत.

राज्यातील महिलांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत खलप यांनी सरकारवर जोरदार टीका केली. गोव्यात गेल्या वर्षभरात महिलांविरुद्धच्या ३६७ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. तरीही मुख्यमंत्री महिलांच्या सुरक्षेच्या बाबतीत गोवा देशात आघाडीवर असल्याचे सांगतात. प्रत्यक्षात, रस्त्यांवरील दिवे नीट चालत नाहीत, सुरक्षा कॅमेरे कार्यरत नाहीत. यंदाच्या वर्षाच्या सुरुवातीपासूनच ६३ नवीन प्रकरणे नोंदवली गेली आहेत, असे त्या म्हणाल्या. यासोबतच, महिलांनी सरकारकडून कोणत्याही अपेक्षा ठेवू नयेत, या विधानावरून गोवा महिला आयोगाच्या अध्यक्षांवरही त्यांनी नाराजी व्यक्त केली.अशा जबाबदारीशून्य विधान करणाऱ्यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

महिला सशक्तीकरण आणि राजकीय हक्कांबाबत भूमिका स्पष्ट करत काँग्रेसने ३३% महिलांसाठी आरक्षण त्वरित लागू करण्याची मागणी केली. २०२७ च्या विधानसभा निवडणुकीसाठी जनगणना आणि सीमांकन करून हे आरक्षण लागू करणे गरजेचे आहे. संसद आणि विधानसभेत अधिक महिलांचे प्रतिनिधित्व असणे ही चांगल्या प्रशासनासाठी आवश्यक

पान २ ▶

# सिग्नलवरील बाल भीकप्रश्नी उच्च न्यायालयाच्या कठोर सूचना

## उपाययोजना राबवण्यासंदर्भात तीन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने राज्य सरकारला वाहतूक सिग्नलवर भीक मागणाऱ्या बालकांच्या संरक्षणासाठी आणि बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, २०१५ तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत उपाययोजना राबवण्यासंदर्भात पुढील तीन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.




न्यायालयाने याचिकाकर्ते ॲड. मोझेस पिंटो यांना सरकारसमोर आपल्या सूचना मांडण्याची संधी दिली असून, त्यांच्या मागण्यांचा सरकारने गांभीर्याने विचार करावा, असेही निर्देश दिले आहेत.

ॲड. पिंटो यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेत वाहतूक सिग्नलवर भीक मागणाऱ्या बालकांना तातडीने वाचवण्याच्या उपाययोजनांसाठी सरकारी यंत्रणांना सक्तीचे आदेश देण्याची मागणी केली आहे. तसेच, बाल न्याय कायदा व बीएनएस २०२३ अंतर्गत प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यांनी सरकारकडे केलेल्या महत्त्वाच्या मागण्यांमध्ये बेघर किंवा भीक मागण्यास भाग पडलेल्या मुलांसाठी तात्पुरत्या निवाऱ्याची आणि शिक्षणाच्या संधींची उपलब्धता करून देणे, सार्वजनिक ठिकाणी बाल शोषण रोखण्यासाठी विशेष कृती दलाची निर्मिती करणे आणि जनतेमध्ये या समस्येची जाणीव निर्माण करण्यासाठी व्यापक प्रचार व जनजागृती अभियान राबवणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

ॲड. पिंटो यांच्या जनहित भावनेचा उल्लेख करत न्यायालयाने त्यांना या समस्येवर उपाय सुचवण्याची संधी दिली. त्यांच्या सूचनांचा विचार करून सरकारला योग्य वाटल्यास त्यांची अंमलबजावणी केली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगताना, न्यायालयाने असे मत नोंदवले की गोवा भिक्षा प्रतिबंधक कायदा, १९७२ आणि बाल न्याय कायदा, २०१५ अंतर्गत गुन्हे नोंदवणे ही समस्या सोडवण्याची योग्य पद्धत नाही.

याऐवजी, भिक्षेच्या समस्येच्या मुळाशी जाऊन उपाय शोधणे आवश्यक आहे. फक्त पालकांविरुद्ध कारवाई करून हा प्रश्न सुटणार नाही, तर व्यापक सामाजिक उपाययोजना आखणे गरजेचे आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# ट्रम्प टेरिफला युरोपियन युनियनचा तीव्र विरोध

▶ **भारताच्या निर्यातीवरही होणार परिणाम**

**वॉशिंग्टन, दि. ३ :**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ५ एप्रिलपासून सर्व आयातींवर १०% सार्वत्रिक शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयावर आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून, युरोपियन कमिशनच्या प्रमुख उर्सुला वॉन डेर लेयन यांनी याला जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धक्का असे संबोधले आहे. चीनसह अनेक देशांनी या धोरणाला विरोध दर्शवला असून, अमेरिकेविरोधात प्रतिकार करण्याचा इशारा दिला आहे.




युरोपियन युनियनने स्पष्ट केले आहे की, जर हा प्रश्न चर्चेने सुटला नाही, तर तेही प्रतिकारात्मक उपाययोजना आखतील. वॉन डेर लेयन यांनी सांगितले की, नव्या शुल्कामुळे व्यापारावर परिणाम होईल आणि अनेक देशांवर गंभीर परिणाम होतील. युरोपियन संसदेच्या आंतरराष्ट्रीय व्यापार समितीचे अध्यक्ष बर्ड लँगे यांनी पुढील आठवड्यात ईयू सदस्य राष्ट्रांमध्ये चर्चा होईल, असे सांगितले.

चीनने अमेरिकेला नव्या कराविरोधात तातडीने भूमिका बदलण्याचे आवाहन केले असून, आवश्यकतेनुसार तीव्र उपाययोजना करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. अमेरिकेने चीनमधून येणाऱ्या वस्तूंवर ३४% अतिरिक्त शुल्क लादले असून, एकूण कर ५४% वर पोहोचला आहे. जपानने या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करताना जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे म्हटले आहे. दक्षिण कोरियाचे कार्यवाहक अध्यक्ष हान डक-सू यांनी हा व्यापार युद्धाचा प्रारंभ असल्याचे सांगत सरकार त्यावर उपाय शोधत असल्याचे स्पष्ट केले.

ब्राझीलने ट्रम्प प्रशासनाच्या नव्या शुल्क धोरणाला विरोध करण्यासाठी काँग्रेसमध्ये आर्थिक परस्परविरोधी कायदा मंजूर केला आहे. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी सांगितले की, नव्या टॅरिफमुळे लाखो कॅनेडियन नागरिक प्रभावित होतील आणि त्यावर ठोस पावले उचलली जातील. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी नव्या करांना अन्याय्य संबोधत त्याविरोधात कठोर भूमिका घेण्याचे संकेत दिले आहेत. या नव्या टॅरिफ धोरणामुळे अनेक देशांमध्ये व्यापार युद्ध पेटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ब्रिटनचे पंतप्रधान सर केयर स्टारमर यांनी अमेरिकेसोबत व्यापार करार करण्यासाठी संघर्ष करण्याची तयारी दर्शवली आहे. यासोबतच, फ्रान्स, पोलंड, आयर्लंड आणि इस्रायलसारख्या देशांनीही ट्रम्प यांच्या धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

नव्या कर संरचनेमुळे जागतिक व्यापार व्यवस्थेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. अनेक देशांनी अमेरिकेविरोधात आर्थिक पावले उचलण्याचा इशारा दिला आहे. यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.





